MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**मुख्य महाव्यवस्थापक यांचे कार्यालय**

मुख्य कार्यालय, प्रकाशगड, मुंबई ४०० ०५१
दूरध्वनी क्र. २२६४७४२११ / २६४७४१३१

मुमव्य(सां.वि.)/मराविविकं/ 002303 दिनांक - 22 JAN 2014

## परिपत्रक

**विषय - नवीन विज बिल भरणा केंद्र मंजूरीसाठी मार्गदर्शक तत्वे.**

संदर्भ - १) महाराष्ट्र शासन पत्र क्र. १०९१/सीआर ७३३९/ऊर्जा-१ दिनांक ०७/०८/१९९१
2) Circular No. AD/IF/BC/Private Agency/03249 dtd. 31/01/2005.
3) Circular No. AD/IF/BC/Bank/20956 dtd. 23/06/2005
4) Circular No. AD/IF/BC/Bank /01739 dtd. 20/01/2006.
5) Circular No. Director (Finance)/7221 dtd. 11/03/2013

महावितरणकडून ग्राहकांना विज बिल भरणा करणेसाठी विविध सहकारी पतसंस्था तसेच नागरी सहकारी बँका यांना त्यांचे शाखांमार्फत बिल भरणा केंद्रे उघडण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. या पूर्वी सदर प्रस्तावास मंजूरी देण्याचे अधिकार क्षेत्रिय कार्यालयांकडे देण्यात आलेले होते. परंतु सदर कामामध्ये सुसूत्रता येणेसाठी याबाबतीचे क्षेत्रिय कार्यालयांकडे येणारे प्रस्ताव मुख्य कार्यालयाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात येण्याबाबतच्या सूचना वरील संदर्भ क्र.(५) नुसार देण्यात आलेल्या आहेत.

सदर प्रस्तावांची छाननी करत असताना असे लक्षात आले आहे की, याबाबतीत मुख्यालयाकडून जारी करण्यात आलेल्या वरील उल्लेखित परिपत्रकांची नोंद प्रस्ताव मुख्यालयास पाठविताना क्षेत्रिय कार्यालयाकडून घेतल्या जात नाहीत. तसेच सदरचे प्रस्ताव ब-याच अंशी अपूर्ण स्वरुपात मुख्यालयास पाठविण्यात येतात. त्यामुळे सदर प्रस्तावास मान्यता देण्यासाठी विविध अडचणी येतात व याबाबतीत क्षेत्रिय कार्यालयांचा तसेच मुख्यालय स्तरावरील कर्मचा-यांचा अमूल्य वेळ वाया जातो. तरी सर्व क्षेत्रिय कार्यालयांना असे सूचित करण्यात येत आहे की, विज बिल भरणा केंद्राच्या प्रस्तावाबाबत खालील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे

**अ] पात्रते संबंधीत अटी व शर्ती :**

***सहकारी पतसंस्थाबाबत खालील पात्रतेच्या अटी पूर्ण करणे बंधनकारक आहे.***

१) संस्थेच्या संचालक मंडळाच्या ठरावाची प्रत जोडणे आवश्यक आहे.
२) संस्थेची सभासद संख्या कमीत कमी १०० असावी
३) संस्थेची स्थापना कमीत कमी ३ वर्षापूवी झालेली असावी.
४) संस्थेला मागील सलग ३ वर्षे 'अ' अथवा 'ब' लेखा परिक्षण वर्ग मिळालेला असावा.
५) संस्था ही आर्थिक दृष्ट्या सक्षम असावी या संदर्भात संस्थेने कागदोपत्री पुरावा जसे की वार्षिक ताळेबंद, नफा-तोटा पत्रके इ. जोडावेत ज्या व्दारे संस्थेची आर्थिक क्षमता सिध्द होईल.
६) संस्थेकडे केंद्रिय उत्पादन शुल्क विभागाचे सेवा कराबाबतचे प्रमाण पत्र (Service Tax), तसेच मुंबई दुकाने व संस्था अधिनियम अन्वये नोंदणीचे प्रमाणपत्र असावे.
७) ग्रामीण भागासाठी संबंधित ग्राम पंचायतीचा नोंदणी दाखला जोडण्यात यावा
८) संस्थेकडे आयकर कायदयान्वये आवश्यक असलेला PAN नंबर असावा.
९) संस्थेच्या उपनियमा (Bye-laws) मध्ये विज बिल भरणा केंद्र सुरु करणेच्या उल्लेख असणे आवश्यक आहे.
१०) विज बिल भरणा केंद्रासाठी संस्थेकडे पुरेशी जागा उपलब्ध असावी, तसेच संस्थेकडे विज बिल स्विकारणेसाठी संगणकीय व्यवस्था असावी.
११) पतसंस्थांनी एका पेक्षा जास्त शाखा असल्यास निबंधक कार्यालयाचे त्या प्रत्येक शाखेची शाखा मंजूरीची नोंदणी प्रत जोडावी.

***नागरी सहकारी बँकांबाबत खालील पात्रतेच्या अटी पूर्ण करणे बंधनकारक आहे.***

१) बँकेची महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियम-१९६१ अन्वये नोंदण्यात आलेली असावी.
२) बँकेने RBI ची बँकींग परवाना प्रत जोडावी, एकापेक्षा जास्त शाखा असल्यास त्या प्रत्येक शाखेची RBI ची बँकींग परवाना प्रत जोडावी.

पुढे पहा../-

३) सदर बँकेचे खेळते भाग भांडवल हे कमीत कमी रुपये ५ कोटी पेक्षा जास्त असावे.

४) सदर बँकेची स्थापना ५ वर्षापूवी झालेली असावी.

५) सदर बँकेला मागील सलग ३ वर्षे 'अ' अथवा 'ब' लेखा परिक्षण वर्ग मिळालेला असावा.

६) बँकेकडे केंद्रिय उत्पादन शुल्क विभागाचे सेवा कराबाबतचे प्रमाण पत्र (Service Tax), तसेच मुंबई दुकाने व संस्था अधिनियम अन्वये नोंदणीचे प्रमाणपत्र असावे.

७) बँकेकडे आयकर कायदयान्वये आवश्यक असलेला PAN नंबर असावा.

८) बँक ही आर्थिक दृष्ट्या सक्षम असावी.

९) बँकेच्या उपनियमा (Bye-laws) मध्ये विज बिल भरणा केंद्र सुरु करणेच्या उल्लेख असणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे पतसंस्था / नागरी सहकारी बँक यांनी विज बिल भरणा केंद्राकरीता अटींची पूर्तता झाल्यानंतरच प्रस्ताव मुख्यालयास मंजूरीसाठी पाठविण्यात यावा.

**ब]** ***वरीलप्रमाणे पात्र पतसंस्था / नागरी सहकारी बँका चे प्रस्ताव मुख्यालयास पाठविताना खालील बाबींची दखल घ्यावी व याबाबतची कागदोपत्री दस्ताऐवज प्रस्तावा सोबत जोडण्यात यावा.***

१) प्रस्तावित विज बिल भरणा केंद्राची गरज असणे बाबतचा संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडून शिफारस वजा प्रस्ताव सोबत जोडण्यात यावा. शिफारस करताना प्रस्तावित भरणा केंद्राच्या क्षेत्रामध्ये अस्तित्वात असणा-या इतर विज बिल भरणा केंद्रांचा तपशील (गेल्या तीन महिन्यातील प्रत्येक भरणा केंद्रावरील मासिक जमा रक्कम व ग्राहक) याचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

२) प्रस्तावित विज बिल भरणा केंद्राच्या कार्यक्षेत्रात असणारे ग्राहक संख्या याची स्पष्टपणे नोंद असावी.

३) प्रस्तावित विज बिल भरणा केंद्राऐवजी सदर ठिकाणी ATP Machine बसविण्यात येऊ शकते किंवा काय याबाबत स्पष्टपणे अभिप्राय देण्यात यावा.

४) पतसंस्था / नागरी सहकारी बँक यांचे व्दारे यापूर्वी विज बिल भरणा केंद्र चालविण्यात येत असतील तर अशा केंद्राबाबतचा कार्यक्षमता अहवाल (Performance Report) प्रस्तावा सोबत जोडण्यात यावा. सदर अहवालामध्ये संबंधित संस्थेकडून विज बिल वसूलीच्या कराराचे कुठल्याही प्रकारचे उल्लंघन केले नसल्याचा स्पष्ट उल्लेख असावा.

५) प्रस्तावित संस्थेने महावितरणचा विज बिल भरणा २४ तासाच्या आत महावितरणच्या बँक खात्यावर रोखीने जमा करणे बंधनकारक असल्याचे संमतीपत्रक द्यावेत.

६) प्रस्तावित संस्थेने महावितरण कंपनीच्या खात्यात भरणा करणार असलेल्या बँकेचे नाव खाते क्रमांक तसेच सदरच्या खात्यास Auto-sweep व Internet Banking ची facility आहे काय? याचा स्पष्ट उल्लेख असावा व भरणा करणार असलेल्या बँकेचे व त्या संस्थेचे अंतर (कि.मी.) किती आहे याची नोंद करावी.

७) पतसंस्था / बँका व्यतिरिक्त कोणत्याही संस्थेस अथवा वैयक्तिक व्यक्तीस सदर विज बिल भरणा केंद्र मंजूर केले जाणार नाही.

वरीलप्रमाणे निर्देशित केलेल्या मार्गदर्शक तत्वांची अमंलबजावणी करुनच वीज बिल भरणा केंद्रांचे प्रस्ताव मंडळ कार्यालयाकडूनच (सर्कल ऑफिस) मुख्य कार्यालयास पाठवावीत. प्रस्तावीत विज बिल भरणा केंद्राची संपूर्ण माहिती सोबत दिलेल्या परिशिष्टामध्ये भरुण पाठवावीत तसेच सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे दस्ताऐवजाच्या प्रती प्रस्तावा सोबत जोडलेल्या असाव्यात. अपूर्ण प्रकरणांवर कुठल्याही प्रकारचा पत्र व्यवहार या कार्यालयाकडून केला जाणार नाही.

सहपत्र : परिशिष्ट

**महाव्यवस्थापक (विवले-सांवि)**

**प्रत रवाना :**

**१) सर्व अधिक्षक अभियंता, महावितरण, संवसु मंडळ कार्यालये**

**२) सर्व कार्यकारी अभियंता, महावितरण, संवसु विभागीय कार्यालये**

**प्रत सविनय सादर :**

**१) संचालक (वित्त), महावितरण, मुख्य कार्यालय, मुंबई**

**२) मुख्यमहाव्यवस्थापक (सां.वि.), महावितरण, मुख्य कार्यालय, मुंबई**

**३) सर्व मुख्य अभियंता, महावितरण, संवसु परिमंडळ कार्यालये**

23 JAN 2014
दिनांक ..........
सही ..........

# विज बिल भरणा केंद्र मंजूरीस्तव पाठविताना सादर करावयाचे परिशिष्ट

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>तपशील</th><th>पुर्तता</th></tr>
<tr><td>१</td><td>सदर पतसंस्था/बँकेचे पूर्ण नांव व पत्ता</td><td></td></tr>
<tr><td>२</td><td>नोंदणी क्रमांक</td><td></td></tr>
<tr><td>३</td><td>पॅन नंबर</td><td></td></tr>
<tr><td>४</td><td>सर्व्हिस टॅक्स नोंदणी क्रमांक</td><td></td></tr>
<tr><td>५</td><td>मुख्य शाखेशिवाय इतर शाखेसाठी मागणी केली असल्यास त्या शाखेची बँकेसाठी RBI ची मंजूरी प्रत व पतसंस्थेसाठी निबंधक कार्यालयाची मंजूरी प्रत जोडलेली आहे काय?</td><td></td></tr>
<tr><td>६</td><td>सदर पतसंस्था/बँकेचे राष्ट्रीयकृत बँकेत असणा-या खात्याची माहीती</td><td></td></tr>
<tr><td></td><td>अ) बँकेचे नांव</td><td></td></tr>
<tr><td></td><td>ब) बँकेचा संक्षिप्त पत्ता</td><td></td></tr>
<tr><td></td><td>क) खाते क्रमांक</td><td></td></tr>
<tr><td>७</td><td>सदर पतसंस्था/बँकेकडे विज बिल केंद्रासाठी स्वतंत्रपणे संगणकीय जसे संगणक / प्रिंटरची व्यवस्था आहे काय?</td><td></td></tr>
<tr><td>८</td><td>सदर पतसंस्था/बँकेकडे इंटरनेटची सुविधा आहे काय?</td><td></td></tr>
<tr><td>९</td><td>सदर केंद्रांचे मागील सलग तीन वर्षाचे लेखा परिक्षण वर्ग, नफा तोटा व खेळते भागभांडवल<br>(रक्कम रु. लाखात)</td><td><table><tr><th>वर्ष</th><th>भागभांडवल</th><th>नफा-तोटा</th><th>ऑडीट वर्ग</th></tr><tr><td></td><td></td><td></td><td></td></tr><tr><td></td><td></td><td></td><td></td></tr><tr><td></td><td></td><td></td><td></td></tr></table></td></tr>
<tr><td>१०</td><td>सदर केंद्र (बँकेसाठी ) अ व ब परिशिष्ट पूर्णपणे भरलेले आहेत काय?</td><td></td></tr>
<tr><td>११</td><td>Transit व Fidelity Insurance यांच्या अद्यावत प्रती जोडलेल्या आहेत.</td><td><table><tr><td>अ</td><td>पॉलिसी क्र.</td><td></td></tr><tr><td>ब</td><td>पॉलिसीची रक्कम</td><td></td></tr><tr><td>क</td><td>पॉलिसीची मुदत</td><td></td></tr></table></td></tr>
<tr><td>१२</td><td>सदर केंद्रांच्या जागे संबंधिचा पुरावा जसे स्वत:ची जागा असल्यास त्याचा दस्तावेज अथवा भाडोत्री असल्यास त्याचा भाडेकरारनामा इ.</td><td></td></tr>
<tr><td>१३</td><td>सदर पतसंस्थेची सभासद संख्या किमान १०० आहे काय ? (मागील २ वर्षापासून)</td><td></td></tr>
<tr><td>१४</td><td>केंद्र विज बिल रक्कमेचा भरणा महावितरण कंपनीच्या बँक खात्यात जमा करणार असलेल्या बँकेची माहिती.</td><td></td></tr>
<tr><td></td><td>अ) बँकेचे नांव</td><td></td></tr>
<tr><td></td><td>ब) शाखेचे नांव</td><td></td></tr>
<tr><td></td><td>क) खाते क्रमांक</td><td></td></tr>
<tr><td></td><td>ड) Internet Banking व View Facility आहे काय?</td><td></td></tr>
<tr><td></td><td>इ) Auto-Sweep facility आहे काय?</td><td></td></tr>
<tr><td>१५</td><td>सदर केंद्राची बँक व ते त्यांचा भरणा महावितरण बँकेच्या खात्यात करणार असणा-या शाखेतील अंतर</td><td></td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| १६ | सदर केंद्राची जागेची स्थळ तपासणी सहाय्यक अभियंता/ कार्यकारी अभियंता यांचे व्दारे केलेली आहे काय? असल्यास तो अहवाल सोबत जोडावा. | |
| १७ | वरीलप्रमाणे सर्व कागदपत्राची योग्य ती खातरजमा करुन योग्य ती कागदपत्रे उप-व्यवस्थापक (विवले) यांनी साक्षांकित केलेली आहे काय? | |
| १८ | सदर केंद्रास विज बिल भरणा केंद्र देणे गरजेचे आहे काय? असल्यास त्यांची आवश्यकता थोडक्यात स्पष्ट करा. (असल्यास वेगळी टिपणी जोडावी) | |
| १९ | सदर केंद्र ज्या परिसरात आहे त्या उपविभागाचे / पीसी चे एकूण ग्राहक | उपविभाग : BU No.<br>पी. सी. : |
| २० | या परिसरात सध्या अस्तित्वात असणारे इतर विज बिल भरणा केंद्रांची माहिती | जिल्हा बँक :<br>पोस्ट ऑफिस :<br>इतर पतसंस्था / बँक :<br>ATP Machine : |
| २१ | साधारणपणे ३००० पेक्षा जास्त ग्राहक असल्यास त्या ठिकाणी ATP Machine ची शिफारस केलेली आहे काय? | |
| | इतर | |
| | | |

सहाय्यक अभियंता
मराविविकं मर्यादित
______ उपविभाग

उपव्यवस्थापक (विवले)
मराविविकं मर्यादित
________विभाग

कार्यकारी अभियंता
मराविविकं मर्यादित
______विभाग

**List of documents to be Submitted along with the proposal for approval of new collection centre.**
**[All zerox copies to be duly attested by Dy.Manager (F&A)of the Division]**

1) Board of Director's Resolution
2) Copies of Annual Report for the period of last 3 years alongwith Audit Report.
3) Copy of Bye-laws
4) Copy of RBI liscence for the branch/ Bank where collection centre is proposed
5) Service Tax Registrations Copy
6) PAN Card copy
7) Copy of Shop & Establishment Act.
8) Copy of current period Insurance policy (Transit & Fidelity)
9) Report of existing collection centres nearby the proposed centre showing monthwise no. of receipts and amount collected for each collection centre for last three months.
10) Copy of the Agreement, if the premises is hired on rent.